जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक २०७ | शुक्रवार, २० फेब्रुवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210

BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER

## संक्षिप्त

### राजा शिवाजीचे दमदार पोस्टर रिलीज

**मुंबई, ता. १९ :** छत्रपति शिवाजी महाराज जयंतीच्या शुभमुहूर्तावर अभिनेता रितेश देशमुखच्या महत्त्वाकांक्षी राजा शिवाजी या चित्रपटाचा पहिला लूक प्रदर्शित करण्यात आलाय. जिओ स्टुडिओज आणि मुंबई फिल्म कंपनीने या भव्य ऐतिहासिक चित्रपटाचे पोस्टर सोशल मीडियावर शेअर करत चाहत्यांची उत्सुकता शिगेला पोहोचवलीय. या द्विभाषिक (मराठी-हिंदी) चित्रपटाचे दिग्दर्शन स्वतः रितेश देशमुख करत असून, यात तो छत्रपती शिवरायांच्या मुख्य भूमिकेत दिसणार आहे. प्रदर्शित झालेल्या पोस्टरमध्ये महाराजांचा तेजस्वी चेहरा आणि हाती धरलेली तलवार त्यांच्या जिद्दीची साक्ष देत आहे. अजय-अतुल यांचे संगीत आणि संतोष सिवन यांचे छायांकन असलेला हा चित्रपट स्वराज्य स्थापनेची प्रेरणादायी गाथा जागतिक स्तरावर मांडणार आहे. ज्योती देशपांडे आणि जेनेलिया देशमुख यांची निर्मिती असलेला हा चित्रपट मे रोजी जगभरात प्रदर्शित होणार असून, शिवरायांचा जाज्वल्य इतिहास पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर जिवंत होणार आहे.

# लोणी काळभोर पोलिस ठाण्यातील ३२ जणांच्या एकाचवेळी बदल्या

## पोलीस ठाण्याच्या कामकाजावर परिणाम होणार? पोलिस दलात खळबळ

**लोणी काळभोर, ता. १९ :** शहर पोलिस दलात मोठी खळबळ उडवणारा निर्णय समोर आला असून लोणी काळभोर पोलीस ठाण्यात बदल्यांचा अक्षरशः बॉम्ब पडला आहे. प्रशासकीय कारणास्तव एकाच वेळी तब्बल ३२ कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. हे आदेश अमितेश कुमार यांनी बुधवारी (ता. १८) रात्री उशिरा परिपत्रकाद्वारे जारी केले.




एकाच ठाण्यातील एवढ्या मोठ्या संख्येने कर्मचाऱ्यांच्या बदल्या झाल्याने संपूर्ण पुणे शहर पोलिस दलात जोरदार चर्चा रंगली आहे. या निर्णयामागील नेमकेकारण काय? अचानक एवढ्या मोठ्या प्रमाणावर हालचाल का? याबाबत तर्क-वितर्कांना उधाण आले आहे. पुणे शहर पोलीस आयुक्तांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मधील कलम २२ (एन) अन्वये हे आदेश दिले आहेत.

या आदेशानुसार ३ सहाय्यक फौजदार, १० पोलीस हवालदार, १९ पोलीस अंमलदार यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. तसेच पोलीस अंमलदार इंद्रजीत जालिंदर डाडर यांची वैद्यकीय व कौटुंबिक अडचणीमुळे विनंतीनुसार बदली करण्यात आली आहे. तत्काळ कार्यमुक्तीचे आदेश वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना संबंधित कर्मचाऱ्यांना तत्काळ कार्यमुक्त करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. बदली झालेल्या कर्मचाऱ्यांनी नव्या ठिकाणी हजर झाल्याचा अनुपालन अहवाल कार्यालयात सादर करणे बंधनकारक असल्याचेही आदेशात स्पष्ट नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, बहुसंख्य कर्मचाऱ्यांची बदली लोहगाव, विमानतळ, चंदननगर आणि सिंहगड रोड पोलीस ठाण्यांकडे करण्यात आली आहे. विशेष म्हणजे लोहगाव व विमानतळ पोलीस ठाण्यांकडे मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ हलविण्यात आले आहे. पोलीस दलात खळबळ एकाच वेळी एवढ्या मोठ्या प्रमाणात बदली आदेश निघाल्याने पोलिस दलात उलटसुलट चर्चा सुरू आहे. काहीजण याकडे नियमित प्रशासकीय प्रक्रिया म्हणून पाहत असले, तरी काहींमध्ये या निर्णयामागील कारणांबाबत उत्सुकता आणि संभ्रम व्यक्त केला जात आहे. दरम्यान, या मोठ्या फेरबदलामुळे लोणी काळभोर पोलीस ठाण्याच्या कामकाजावर काय परिणाम होणार, तसेच नव्या मनुष्यबळासह संबंधित ठाण्यांची कार्यपद्धती कशी बदलणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

**पोलीस अंमलदाराचे नांव (बदलीचे ठिकाण)**

**सहाय्यक फौजदार**

संतोष सुखदेव घावटे (लोहगाव), विनोद ज्ञानेश्वर कांबळे (विमानतळ), रामदास शंकर मेमाणे (चंदननगर),

**पोलीस हवालदार**

**लोहगाव**

विजय नथु जाधव, अश्विनी जयसिंग माळी/अश्विनी दत्ता डबाणे, दिपाली दौलत पाडुळे, गणेश विलास सातपुते.

**विमानतळ**

दादा भिमराव हजारे, सुनिल मदन नागलोत, तेज दिपक भोसले.

**चंदननगर**

प्रदिप भिमराव क्षिरसागर, संभाजी सुभाष दिवेकर, दिगंबर रामदास जगताप.

**पोलीस अंमलदार**

**लोहगाव**

अजिंक्य दिपक जोजारे, शैलेश चांगदेव कुदळे, वैशाली महीपती निकंबे, बाजीराव चंदर वीर, अमोल विष्णु मुंडे, चक्रधर जयद्रथ शिरगिरे, राहुल सुरेंद्र माळगे, ईश्वर हरीदास भगत.

**विमानतळ**

प्रशांत प्रकाश सुतार, अक्षय राजेंद्र कटके , बालाजी संदीपान बांगर, संदिप किशन धुमाळ, प्रविन नामदेव सपकाळ, मल्हारी शिवाजी ढमढेरे, दिपक सुनिल सोनवणे, कोमल सोमेश्वर आखाडे.

**सिंहगड रोड**

किशोर पांडुरंग कुलकर्णी, वसंत भानुदास चव्हाण, घनश्याम कुमार आडके.




# भाजपमध्ये राज्यसभेसाठी इच्छुकांची भाऊगर्दी

**नवी दिल्ली, ता. १९ :** महाराष्ट्रातील राज्यसभेतील सात जागा रिक्त होत आहे. त्यामुळे या जागांसाठी मतदान होणार आहे. या निवडणुकीचा कार्यक्रम निवडणूक आयोगाने जाहीर केला आहे. सहा जागा महायुती जिंकेल तर एक जागा महाविकास आघाडीच्या वाट्याला येणार आहे.

निवृत्त होणाऱ्या सात राज्यसभेच्या खासदारांमध्ये शरद पवार यांचा देखील समावेश असून, त्यांच्या नावाची शिफारस आघाडीकडून केली जाणार असल्याचे बोलले जात आहे. दुसरीकडे सहा जागांसाठी भारतीय जनता पक्षात इच्छुकांची भाऊगर्दी वाढल्याचे चित्र आहे. यामध्ये काही महत्वाच्या नेत्याच्या नावाची जोरदार चर्चा राज्यसभेसाठी रंगली आहे.

या निवडणुकीसाठी ५ मार्च रोजी उमेदवारी अर्ज दाखल करण्यात येणार असून, १६ मार्चला मतदान होणार आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील राजकीय वातावरण तापले आहे.

दरम्यान, विनोद तावडे, रामदास आठवले, विजया रहाटकर, भागवत कराड, धैर्यशील पाटील या नेत्यांची नावे चर्चेत आहेत. तर मागील काही वर्षांत बाहेरून पक्षात दाखल झालेल्या नेत्यांना राज्यसभा किंवा विधान परिषदेवर संधी दिली गेल्याने भाजपमधील काही निष्ठावंत गटात नाराजी आहे. त्यामुळे यावेळी तरी निष्ठावंतांना प्राधान्य द्यावे, अशी मागणी पक्षातील एका गटाकडून केली जात असल्याचे समजते.

# व्हीएसआरवर तात्काळ बंदी घालावी; जय पवार यांनी केली मागणी

**बारामती, ता. १९ :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातामध्ये अपघातग्रस्त विमानाचा ब्लॅक बॉक्स डॅमेज झाल्याच्या चर्चा सुरु झाल्या होत्या. यासंदर्भात जय पवार यांनी इन्स्टाग्राम स्टोरी शेअर करत प्रतिक्रिया दिली आहे. जय पवार यांनी विमान अपघातात ब्लॅक बॉक्स सहजपणे नष्ट होऊ शकत नाही, असे म्हटले आहे. याशिवाय व्हीएसआरला तात्काळ उड्डाणे चालवण्यास बंदी घालावी, अशी मागणी देखील जय पवार यांनी केली आहे.



अजित पवारांच्या कुटुंबातील व्यक्तीकडून पहिल्यांदाच अजित पवार यांच्या अपघातावर जाहीर प्रतिक्रिया देण्यात आली आहे. जय पवार यांनी आपल्या इन्स्टाग्राम स्टोरीत म्हटले की, विमान अपघातात ब्लॅक बॉक्स सहजपणे नष्ट होऊ शकत नाहीत, महाराष्ट्रातील जनतेला आपल्या हृदयाला हादरवून टाकणाऱ्या या दुर्घटनेचे संपूर्ण, पारदर्शक आणि निर्विवाद सत्य जाणून घेण्याचा हक्क आहे. तसेच व्हीएसआरला तात्काळ उड्डाणे चालविण्यास बंदी घालून, त्यांच्या विमानांच्या देखभालीत झालेल्या संभाव्य गंभीर गैरव्यवहाराबद्दल सखोल आणि निष्पक्ष चौकशी केलीच पाहिजे, असे त्यांनी म्हटले आहे.

रोहित पवारांचेही अनेक प्रश्न राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आमदार रोहित पवार यांनी आज पुन्हा पत्रकार परिषद घेऊन दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत अनेक प्रश्न उपस्थित केले. हा अपघात नाही तर घातपात असल्याचा संशय व्यक्त करणाऱ्या रोहित पवार यांनी त्या पुढे जात हे विमान मुद्दाम आदळवण्यात आल्याचा संशय व्यक्त केला आहे.

बारामतीला दृश्यमानता कमी होती तर विमान उतरवण्याच्या प्रयत्नच करायला नको होता. विमान मुंबईला परत नेता आले असते. विमानात इंधन मोठया प्रमाणात होते. या शिवाय इंधनाचे अनेक कॅन विमानात ठेवलेले होते. त्यामुळे हे विमान मुद्दाम आदळवण्यात आले आहे की काय असे आम्हाला वाटायला लागले आहे, असा संशय त्यांनी व्यक्त केला.

# शिव, शाहू, फुले-आंबेडकरांच्या विचारांचा वारसा कधीही सोडणार नाही

## शिवनेरीवर भाषणादरम्यान सुनेत्रा पवार भावूक

**जुन्नर, ता. १९ :** शिवजयंती हा केवळ उत्सव नाही तर स्वराज्य, स्वाभिमान आणि सुशासनाचा संकल्प दृढ करण्याचा दिवस आहे. शिवजयंतीनिमित्ताने शिवनेरीवर हजर राहणे हा क्षण माझ्यासाठी अत्यंत महत्वाचा आणि तितकाच भावनिक आहे, असे राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या. यावेळी भाषण करताना सुनेत्रा पवार भावूक झाल्या.

हा दिवस माझ्यासाठी अत्यंत वेगळा आणि जबाबदारीची जाणीव करुन देणारा आहे. नुकतेच मी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली आहे. पण, ज्या कठीण प्रसंगात मी शपथ घेतली त्यावेळी माझ्या डोळ्यासमोर आई जिजाऊ उभ्या होत्या, असे सुनेत्रा पवार म्हणाल्या. सुनेत्रा पवार यावेळी भावूक झाल्या होत्या. जिजाऊंनी शिवरायांना स्वराज्याचा ध्यास दिला, संस्कार दिले आणि संकटांशी दोन हात करण्याची जिद्द दिली हीच आपली प्रेरणा असल्याचे सुनेत्रा पवार म्हणाल्या.




**शिव शाहू फुले आंबेडकरांचा वारसा**

अजित पवारांनी ज्या विचारांवर वाटचाल केली तो शिव शाहू फुले आंबेडकरांच्या विचाराचा वारसा कधीही सोडणार नाही, असेही सुनेत्रा पवार यावेळी म्हणाल्या. शिवजयंतीच्या निमित्ताने अजित पवार शिवनेरीवर कायम उपस्थित राहत होते, असेही पवार यांनी सांगितले.

शिवनेरीबाबत अजित पवारांच्या आठवणी आणि दृष्टीकोन सांगताना सुनेत्रा पवार यांचा कंठ दाटून आला. अजित पवार यांनी शिवनेरी विकास आराखडा, रायगड विकास आराखडा, आग्रा आणि संगमेश्वर येथील स्मारकासाठी अजित पवार यांनी पुढाकार घेऊन पाठपुरावा केला, असे उपमुख्यमंत्री पवार म्हणाल्या.

# शेतकरी कर्जमाफीचा मुहूर्त ठरला; चंद्रशेखर बावनकुळे यांचं विधान

**मुंबई, ता. १९ :** राज्य शासनाने कर्जमाफीचा निर्णय घेण्यासंदर्भात ३० जूनपर्यंतची मुदत दिली आहे. परदेशी समितीचा अहवाल येणार असून, त्यानुसार निर्णय घेतला जाईल. मुख्यमंत्री स्वतः या विषयात सकारात्मक आहेत. ज्या शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने गरज आहे, त्यांना कर्जमाफी देण्याबाबत योग्य निर्णय घेतला जाईल, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. शेतकरी आंदोलकांनी ३० जूनपर्यंत संयम ठेवावा, कर्जमाफीबद्दल सरकारची भूमिका सकारात्मक असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. पुढील काही दिवसांत राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचा मुद्दा उपस्थित होत आहे.



शेतकरी कर्जमाफीसाठी बच्चू कडू यांनी आंदोलन केल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकरी कर्जमाफी जून २०२६ मध्ये करण्याचे आश्वासन दिले. यासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी राज्य सरकारने मित्र संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीणसिंह परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली ऑक्टोबर २०२५ मध्ये समिती स्थापन केली.

दरम्यान, या समितीचा अहवाल एप्रिलमध्ये येणे अपेक्षित असल्याने यंदाच्या अर्थसंकल्पात शेतकरी कर्जमाफीसाठी निधीची तरतूद केली जाण्याची शक्यता दिसत नाही. अहवाल सादर झाल्याशिवाय सरकारवर किती आर्थिक बोजा पडणार, हे स्पष्ट होणार नाही. त्यामुळे शासन शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याबाबत काय निर्णय घेणार, याकडे लक्ष लागले आहे.

# लोणी काळभोरमध्ये शिवरायांचा जयघोष; एमआयटी एडीटी विद्यापीठात मर्दानी खेळातून थरारक मानवंदना

**लोणी काळभोर, ता. १९ :** सनई-चौघड्यांचे मंजुळ स्वर, तुतारीच्या गगनभेदी गर्जना, ढोल-ताशांचा निनाद, भगव्या पताका आणि मर्दानी खेळांसह छत्रपती शिवाजी महाराज की जय!, जय भवानी, जय शिवराय! आणि नमो पार्वती पते, हर हर महादेव या घोषणांच्या जयघोषात एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठ येथे महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.




विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारावरील शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्याजवळ विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश कराड यांच्या हस्ते हिंदवी स्वराज्याचे प्रतीक असलेला भगवा ध्वज फडकावून जयंती उत्सवाचा प्रारंभ करण्यात आला. याप्रसंगी महाराष्ट्र लोकसेवा आयोगचे माजी अध्यक्ष डॉ. किशोर राजे निंबाळकर, विद्यापीठाच्या कार्यकारी संचालक प्रा. डॉ. सुनीता कराड, कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस., प्रोवोस्ट डॉ.सायली गणकर, प्र-कुलगुरू डॉ. रामचंद्र पुजेरी, डॉ. मोहित दुबे, डॉ. नचिकेत ठाकूर, कुलसचिव डॉ. महेश चोपडे आदी मान्यवर उपस्थित होते.

लोणी-काळभोर व कदमवाक वस्ती ग्रामपंचायतीतील नागरिक, विद्यापीठाचे शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि शेकडो विद्यार्थ्यां समोर विद्यार्थ्यांनी शिवरायांवरील कविता, पोवाडे आणि पहाडी आवाजातील शिवगर्जना सादर केल्या. या सादरीकरणामुळे उपस्थितांच्या अंगावर अक्षरशः रोमांच उभे राहिले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक नृत्य व मैदानी खेळांची प्रात्यक्षिके सादर केली. शिवरायांच्या पालखीसह मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर अश्वारूढ पुतळ्याला क्रेनद्वारे पुष्पहार अर्पण करून महाराजांची आरती करण्यात आली आणि कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी बोलताना प्रा. डॉ. कराड म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज हे उर्जेचा प्रचंड मोठा स्रोत आहेत. आयुष्यात कितीही मोठ्या समस्या आणि संकटे आली, तरी शिवचरित्र वाचल्यास त्यावर मार्ग सापडतो. छत्रपती शिवाजी महाराज आपल्यातच आहेत आणि ते आज ३९६ वर्षांचे झाले असल्याची भावना प्रत्येकाच्या मनात आहे. त्यामुळे शिवछत्रपतींचे गुण आत्मसात करण्याचा प्रत्येकाने प्रयत्न करणे हीच खरी शिवजयंती आहे, असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

### रक्तदान शिबिराला उत्स्फुर्त प्रतिसाद

शिवजयंतीच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठात आयोजित रक्तदान शिबिर आणि गडकिल्ले बनविण्याच्या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उदंड प्रतिसाद लाभला. रक्तदान शिबिरात तब्बल१७० हून अधिक दात्यांनी रक्तदान केल्याने हे शिबिर अत्यंत यशस्वी ठरले. विद्यापीठाच्या नवीन आयटी इमारतीच्या प्रवेशद्वारावर या दोन्ही उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी रक्तदानासारखे सामाजिक उपक्रम राबवून शिवजयंती साजरी केल्याने परिसरातील नागरिकांकडून त्यांचे कौतुक करण्यात येत आहे.

## संक्षिप्त




### हडपसर भागात भरधाव ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू

**हडपसर, ता. १९ :** हडपसर भागात भरधाव ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. शिवम चंद्रकांत माने (वय-२३, रा. गोविंदनगर, वाखरी विसावा, पंढरपूर, जि. सोलापूर ) असे मृत्युमुखी पडलेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे. याबाबत शिवम याचा भाऊ शुभम (वय-२५) याने फुरसुंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दुचाकीस्वार शिवम हा बुधवारी(ता. १८) दुपारी साडेबाराच्या सुमारास हडपसर-सासवड रस्त्यावरील फुरसुंगी भागातून निघाला होता. त्या वेळी भेकराईनगरमधील शिवशक्ती चौकात भरधाव ट्रकने दुचाकीस्वार शिवम याला धडक दिली. अपघातात शिवम गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारांपूर्वीच त्याचा मृत्यू झाला होता. पसार झालेल्या ट्रक चालकाचा शोध घेण्यात येत असून, पोलीस उपनिरीक्षक धुमाळ तपास करत आहेत.

### बिबवेवाडीत भरधाव वाहनाच्या धडकेत पादचारी तरुणाचा मृत्यू

**पुणे, ता. १९ :** भरधाव वाहनाच्या धडकेत पादचारी तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना बिबवेवाडी भागात घडली. या प्रकरणी वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. हडपसरमधील भेकराईनगर परिसरात ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. नितीन वसंत कांबळे (रा. भीमदीप वसाहत, बिबवेवाडी) असे मृत्युमुखी पडलेल्या पादचाऱ्याचे नाव आहे. या प्रकरणी वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत कांबळे यांचे भाऊ सचिन (वय ४५) यांनी बिबवेवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सचिन कांबळे हे १६ फेब्रुवारी रोजी सकाळी अकराच्या सुमारास बिबवेवाडीतील स्वामी विवेकानंद रस्त्याने निघाले होते. त्या वेळी भरधाव वाहनाने रस्ता ओलांडणाऱ्या कांबळे यांना धडक दिली. अपघातानंतर घटनास्थळी न थांबता वाहन चालक पसार झाला. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली. कांबळे यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. पोलीस हवालदार गायकवाड तपास करत आहेत.

### १२ ज्योतिर्लिंगांचे दर्शन करून परतताना मांजरीतील तीन मित्रांचा अपघातात मृत्यू



**पुणे, ता. १९ :** बारा ज्योतिर्लिंग दर्शनासाठी निघालेल्या पुण्याच्या मांजरी परिसरातील तीन तरुणांचा गुजरातमध्ये भीषण रस्ते अपघातात मृत्यू झाला. तेजस दगडे, अभिषेक यादव आणि सचिन बिरादार असे तिघांचे नाव आहे. तीन मित्रांचा अपघाती मृत्यू झाल्यामुळे संपूर्ण मांजरी बुद्रुक गावावर शोककळा पसरली आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, हे तिघे मित्र गेल्या १८ दिवसांपासून आनंदाने देवदर्शनासाठी प्रवास करत होते. तीर्थयात्रा पूर्ण करून पुण्यात येतांना मंगळवारी पहाटे दोनच्या सुमारास काळाने झडप घातली. गुजरातच्या दाहोद जिल्ह्यातील इंदूर-अहमदाबाद महामार्गावरील धाधेला वळणावर त्यांची कार अनियंत्रित झाली. वेगात असलेली ही कार दुभाजकाला (डिव्हायडर) इतक्या जोरात धडकली की, तिचा अक्षरशः चक्काचूर झाला. धडक इतकी भयानक होती की, कारचं इंजिन तुटून थेट बाजूच्या शेतात फेकलं गेलं. यात २ जणांचा जागीच मृत्यू झाला, तर एकाचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला.

### रस्ते अपघातातील जखमींना आता दीड लाखांपर्यंत मोफत उपचार

**मुंबई, ता. १९ :** रस्ते अपघातात जखमी होणाऱ्या व्यक्तींचा जीव वाचवण्यासाठी केंद्र सरकारने पीएम राहत ही नवी योजना सुरू केलीय. या योजनेचा सर्वात मोठा फायदा म्हणजे अपघातग्रस्ताला आता पैशांअभावी उपचारांपासून वंचित राहावे लागणार नाही. अपघातानंतरच्या पहिल्या तासात, ज्याला गोल्डन आवर म्हणतात, तातडीने उपचार मिळावेत यासाठी सरकार दीड लाख रुपयांपर्यंतचा सर्व खर्च उचलणार आहे. ही सुविधा कॅशलेस असून रुग्णालयात  दिवसांपर्यंत मोफत उपचार मिळतील. या योजनेचा लाभ घेण्यासाठी अपघात झाल्यावर त्वरित  या हेल्पलाइन क्रमांकावर फोन करावा लागेल. त्यानंतर जखमीला जवळच्या रुग्णालयात नेले जाईल. विशेष म्हणजे, अपघात शहर, हायवे किंवा ग्रामीण भागात कुठेही झाला तरी या योजनेचा लाभ घेता येईल. ही सर्व प्रक्रिया डिजिटल पद्धतीने चालणार असून उपचारांचा खर्च सरकार थेट रुग्णालयाला देईल.

# कोपरगावात बनावट खताचा ट्रक जप्त; २४ टन साठा सील, खत माफियांमध्ये खळबळ

**अहिल्यानगर, ता. १९ :** कोपरगाव तालुक्यातील तहसील कार्यालय परिसरात कृषी विभाग आणि शहर पोलिसांनी संयुक्त कारवाई करत बनावट रासायनिक खताने भरलेला ट्रक जप्त केला आहे. गेल्या काही दिवसांत झालेली ही दुसरी मोठी कारवाई असल्याने खत माफियांमध्ये खळबळ उडाली आहे.

मंगळवारी (१७ फेब्रुवारी) रात्री साडेआठच्या सुमारास कृषी विभागाला गुप्त माहिती मिळाली होती की, MH २० DE ०९९९ क्रमांकाचा ट्रक संवत्सरा परिसरातून वैजापूरच्या दिशेने जात असून त्याम ध्ये बनावट खताची वाहतूक होत आहे. माहितीची खातरजमा होताच कृषी विभागाचे निरीक्षक गणेश बिरवाडे आणि शहर पोलिसांनी



तातडीने सापळा रचला. तहसील कार्यालय परिसरात ट्रक अडवून झडती घेतली असता त्यामध्ये ४७७ पोत्यांमध्ये भरलेले रासायनिक खत आढळून आले.

चौकशीदरम्यान ट्रक चालक भुजंग नामदेव केवार (रा. बौद) याच्याकडे संबंधित खताबाबत कोणतीही वैध बिले, परवाने किंवा अधिकृत कागदपत्रे नसल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे हा साठा बेकायदेशीर असल्याचा प्राथमिक निष्कर्ष काढण्यात आला. जप्त केलेल्या खताचे एकूण वजन सुमारे २४ टन असून त्याची अंदाजे किंमत ६ लाख २४ हजार २४० रुपये इतकी असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. या प्रकरणी पोलिसांनी ट्रक चालकासह संबंधित चार कंपन्यांच्या व्यवस्थापकीय संचालकांविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम ३१६ (४) तसेच जीवनावश्यक वस्तू कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, तालुका कृषी अधिकारी मनोज सोनवणे, उपनिरीक्षक संदीप सोझे आणि दिव्या थेटे यांच्या पथकाने ही कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली.

जप्त केलेला ट्रक पुढील तपासासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या गोदामात हलवून सील करण्यात आला आहे. एपीएमसीच्या प्राथमिक तपासणीत संबंधित खत खते (नियंत्रण) आदेश १९६५ तसेच उत्पादन शुल्क कायदा १९६६ मधील निकषांची पूर्तता करत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

या घटनेनंतर कृषी विभागाने शेतकऱ्यांना सावधगिरीचे आवाहन केले आहे. खत खरेदी करताना अधिकृत विक्रेत्यांकडूनच खरेदी करावी, बिल आणि पावत्या जतन कराव्यात तसेच संशयास्पद साठा किंवा वाहतूक आढळल्यास तात्काळ प्रशासनाला कळवावे, असे आवाहन करण्यात आले आहे. बनावट खतामुळे पिकांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता असल्याने अशा प्रकारांवर कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

### मोरगाव येथे धावत्या टेम्पोखाली अनोळखी तरुणाची उडी

**बारामती, ता. १९ :** मोरगाव मध्ये बुधवारी सकाळच्या सुमारास एका सुन्न करणाऱ्या घटनेने खळबळ उडाली. मोरगाव पोलीस मदत केंद्राच्या अगदी समोर, एका अज्ञात तरुणाने समोरून येणाऱ्या भरधाव टेम्पोच्या चाकाखाली स्वतःला झोकून देत आपली जीवनयात्रा संपवली. ही घटना इतकी अनपेक्षित होती की, कोणालाही काही सम जण्याच्या आत त्या तरुणाचा जागीच अंत झाला.

सकाळचे सात ते आठ वाजले होते, सीसीटीव्ही फुटेजमधून समोर आलेल्या माहितीनुसार, हा तरुण रस्त्याकडेला असलेल्या एका दुकानाच्या पायरीवर शांतपणे बसलेला होता. मात्र, समोरून एक अवजड टेम्पो येताना दिसताच, त्याने अचानक उठून रस्त्याच्या दिशेने धाव घेतली आणि थेट टेम्पोच्या मागील चाकाखाली स्वतःला झोकून दिले. चालकाने ब्रेक दाबण्याचा प्रयत्न केला, पण तोपर्यंत उशीर झाला होता.

## गनिमी कावा म्हणजे कपट नव्हे; बलाढ्य शत्रूला नमवण्याचे डिप्लोमॅटिक शास्त्र : प्रा. डॉ. गायकवाड

**लोणी काळभोर, ता. १९ :** गनिमी कावा म्हणजे केवळ कपट किंवा फसवणूक नसून, बलाढ्य शत्रूला नमवण्यासाठी वापरलेले अत्यंत प्रभावी आणि मुत्सद्दी तंत्र आहे, असे प्रतिपादन प्रा. डॉ. शिवाजी गायकवाड यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ पराक्रमी योद्धे नव्हते, तर काळाच्या पुढचा विचार करणारे मास्टर डिप्लोमॅट होते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

लोणी काळभोर (ता. हवेली) येथील समाजभूषण गणपतराव काळभोर महाविद्यालय येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने शिवजयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. पुढे बोलताना डॉ. गायकवाड म्हणाले, गनिमी कावा म्हणजे शत्रूला गाफील ठेवून त्याच्यावर अचूक वेळी झडप घालणे. आज जगभरातील आधुनिक सेना सर्जिकल स्ट्राईक किंवा स्पेशल ऑपरेशन्समध्ये जे तंत्र वापरतात, त्याचे मूळ स्वरूप महाराजांच्या युद्धनीतीत दिसून येते. कमीत कमी जीवितहानी करून जास्तीत जास्त यश मिळवणे, हा खऱ्या मुत्सद्देगिरीचा मुख्य नियम आहे.

महाराजांनी सह्याद्रीच्या डोंगररांगा, दऱ्या आणि घनदाट जंगलांचा अचूक वापर करून शत्रूला अशा ठिकाणी खेचून आणले, जिथे त्यांचे संख्याबळ निष्प्रभ ठरेल, असे त्यांनी सांगितले. जावळीच्या अरण्यात खानाला येण्यास भाग पाडणे ही एक प्रकारची डिप्लोमॅटिक ट्रॅप होती. स्वतःच्या सुरक्षेसाठी वाघनखे आणि बिचवा बाळगणे ही फसवणूक नसून संभाव्य दगाबाजीला दिलेले चतुर उत्तर



होते, असे त्यांनी ठामपणे नमूद केले.

प्राचार्य डॉ. अंबादास मंजुळकर यांनी समारोप करताना सांगितले की, महाराजांनी केवळ युद्धे जिंकली नाहीत, तर एक शिस्तबद्ध आणि लोकाभिमुख प्रशासन व्यवस्था उभी केली. त्यांनी अष्टप्रधान मंडळ नेमून कामाची स्पष्ट विभागणी केली. रयतेची काळजी घेणारा राजा म्हणून त्यांची ओळख होती. शेतकऱ्याच्या भाजीच्या देठालाही हात लावू नका अशी सक्त आज्ञा त्यांनी दिली होती.

परस्त्रीला मातेसमान मानण्याची शिकवण, सर्व धर्मांना समान स्थान आणि सैन्यात मुस्लिम अधिकाऱ्यांचा सहभाग यामुळे त्यांच्या स्वराज्याची व्यापक व सर्वसमावेशक दृष्टी स्पष्ट होते, असेही त्यांनी नमूद केले. गुलामगिरीच्या मानसिकतेत अडकलेल्या समाजाला स्वाभिमान शिकवण्याचे महान कार्य महाराजांनी केले. त्यांचे कार्य आजही व्यवस्थापन, युद्धशास्त्र आणि मानवी मूल्यांसाठी प्रेरणादायी आहे, असे ते म्हणाले.

दरम्यान, या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक प्रा. डॉ. संभाजी निकम यांनी केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





## भोसरीत पोलिसांनी १६ किलो गांजासह दोघांना रंगेहाथ पकडलं

**भोसरी, ता. १९ :** मोठ्या प्रमाणात गांजाची साठवणूक करून तो विक्रीसाठी आणणाऱ्या दोघांना पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. ही कारवाई मंगळवारी रात्री दीड वाजताच्या सुमारास गोविंद गार्डन जवळ, देवकर वस्ती, भोसरी येथे करण्यात आली.

विशाल रावण मोहिते (वय-२४, रा. यमाई नगर, साई पार्क, दिघी गाव) आणि गणेश बाबुराव थोरात (वय -२४, रा. यमाई नगर, साई पार्क, दिघी गाव) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल अशोक आबासाहेब माने (वय-२४) यांनी मंगळवारी (ता. १७) भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भोसरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गोविंद गार्डन जवळ, देवकर वस्ती,

येथे मोकळ्या जागेत मंगळवारी रात्री दीड वाजताच्या सुमारास आरोपींनी विक्रीसाठी १६ किलो १२० ग्रॅम वजनाचा गांजा बेकायदेशीरपणे जवळ बाळगला होता. पोलिसांनी धाड टाकून त्यांच्याकडून ८ लाख ८० हजार रुपये किमतीचा हा मुद्देमाल जप्त केला आहे. भोसरी पोलीस याबाबत अधिक तपास करत आहेत.

## महापौरपदाच्या निवडणुकीपूर्वी भिवंडीत भाजपला खिंडार; ९ नगरसेवकांचा काँग्रेसला पाठिंबा

**भिवंडी, ता. १९ :** निजामपूर शहर महानगरपालिकेच्या महापौरपदाच्या निवडणुकीपूर्वी भारतीय जनता पक्षाला मोठा धक्का बसला आहे. भाजपच्या २२ पैकी ९ नगरसेवकांनी बंडाचे निशाण फडकवत स्वतंत्र गट स्थापन केला असून, त्यांनी काँग्रेस-राष्ट्रवादी (शरद पवार गट) आघाडीला पाठिंबा जाहीर केला आहे. या राजकीय भूकंपामुळे भिवंडी महापालिकेत आता काँग्रेसचा महापौर बसण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

नऊ बंडखोर नगरसेवकांनी भिवंडी सेक्युलर फ्रंट नावाने आपला नवीन गट स्थापन केला असून, त्यांनी महाविकास आघाडीच्या बाजूने उभे राहण्याचा निर्णय घेतला आहे. या पाठिंब्यामुळे ९० सदस्यीय संख्याबळ असलेल्या महापालिकेत काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडीने




बहुमताचा ४६ हा आकडा पार केला आहे. गेल्या महिन्यात झालेल्या निवडणुकीत कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नव्हते, त्यामुळे सत्तेची गणिते कमालीची गुंतागुंतीची झाली होती.


काँग्रेस ३० जागांसह सर्वात मोठा पक्ष ठरला होता, तर भाजपचे २२, शिवसेनेचे १२ आणि राष्ट्रवादीचे (शप) १२ नगरसेवक निवडून आले आहेत. याशिवाय समाजवादी पक्षाचे ६, कोणार्क विकास आघाडीचे ४ आणि भिवंडी विकास आघाडीचे ३ सदस्य असून एक अपक्ष निवडून आला आहे.

भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना यांच्यातील वाढत्या मतभेदामुळे भाजपमध्ये ही फुट पडल्याचे मानले जात आहे. विशेष म्हणजे, यापूर्वी समाजवादी पक्षाने शिवसेनेला पाठिंबा दिला होता, मात्र बदलत्या समीकरणांमुळे आता सत्तेचे पारडे काँग्रेसच्या बाजूने झुकले आहे.

## वाघोलीत रंगणार ऐतिहासिक ६८ वी महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा

**पुणे, ता. १९ :** राज्यातील कुस्तीविश्वातील सर्वात मानाची समजली जाणारी ६८ वी महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा यंदा पुणे जिल्ह्यातील वाघोली येथे होणार आहे. १८ ते २२ मार्चदरम्यान ही भव्य स्पर्धा पार पडणार असून कुस्तीगीर परिषदेच्या पुण्यात झालेल्या बैठकीत वाघोलीच्या नावावर अधिकृत शिक्कामोर्तब करण्यात आले. बैठकीला कुस्तीगीर परिषदेचे अध्यक्ष रामदास तडस यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

या राज्यस्तरीय स्पर्धेत ४२ शहरांमधील सुमारे ८४० कुस्तीगीर विविध वजनी गटांत सहभागी होणार आहेत. माती आणि गादी या दोन्ही प्रकारांत वरिष्ठ गटातील सामने रंगणार आहेत. दरवर्षीप्रमाणे विजेत्या मल्लाला मल्ल मामासाहेब मोहोळ यांच्या स्मरणार्थ १ किलो चांदीची मानाची गदा प्रदान



करण्यात येणार आहे, तर इतर गटांतील विजेत्यांना रोख पारितोषिके देण्यात येतील. महाराष्ट्र केसरी ही स्पर्धा केवळ क्रीडा स्पर्धा नसून राज्याच्या सांस्कृतिक परंपरेचा एक भाग मानली जाते. या स्पर्धेची सुरुवात १९६१ मध्ये कुस्तीमहर्षी मामासाहेब मोहोळ यांच्या पुढाकाराने झाली. पहिली स्पर्धा छत्रपती संभाजीनगर येथे झाली होती आणि दिनकर दह्यारी हे पहिले महाराष्ट्र केसरी ठरले होते.

दरम्यान, राज्याच्या कानाकोपऱ्यातील ग्रामीण भागातील मल्लांना मोठे व्यासपीठ मिळवून देणारी ही स्पर्धा पुण्यात होत असल्याने जिल्ह्यातील क्रीडाप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. महाराष्ट्राच्या परंपरेचा आणि अभिमानाचा मानाचा किताब जिंकण्यासाठी यंदा वाघोलीत पुन्हा एकदा रंगणार आहे कुस्तीचा थरार.

## कायद्याची कसोटी की जनतेचा दबाव?; भिगवणमध्ये मुलीच्या प्रकरणावरून उसळला जनआक्रोश

**सागर जगदाळे**

भिगवण, ता. १९ : एका तरुणीच्या कथित अपहरण प्रकरणाने भिगवणमध्ये तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले असून, या घटनेने कायदा-सुव्यवस्था आणि सामाजिक सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. संबंधित आरोपीवर तत्काळ कारवाई व्हावी आणि मुलीला सुरक्षितपणे कुटुंबीयांच्या ताब्यात द्यावे, या मागणीसाठी मोठ्या संख्येने नागरिक रस्त्यावर उतरले.




या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या हिंदू जनआक्रोश मोर्चात विविध राजकीय नेत्यांनी सहभाग घेतला. बसस्थानक ते पोलीस स्टेशन असा मोर्चा काढण्यात आला आणि त्यानंतर जाहीर सभेत निषेध व्यक्त करण्यात आला. हजारोंच्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित राहिल्याने या प्रकरणाची तीव्रता अधोरेखित झाली.

आमदार गोपीचंद पडळकर यांनी सभेत बोलताना, राजकारण बाजूला ठेवून सर्वांनी एकत्र येत मुलीच्या सुरक्षिततेसाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन केले. तर आमदार संग्राम जगताप यांनी ही लढाई कोणत्याही व्यक्तीविरोधात नसून भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी आहे, असे स्पष्ट केले. सोशल मीडियावर फिरणाऱ्या व्हिडीओ किंवा अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहनही त्यांनी नागरिकांना केले. दरम्यान, संबंधित मुलगी उद्या पोलिसांसमोर हजर न झाल्यास  तारखेला पुढील आंदोलनाची दिशा ठरवली जाईल, असा इशारा देण्यात आला आहे. माऊली हरनावळ, अमोल काटे यांच्यासह इतर मान्यवरांनीही आपली मते मांडली. या संपूर्ण प्रकरणात आता सर्वांचे लक्ष पोलिसांच्या भूमिकेकडे लागले असून, प्रशासन कितपत वेगाने आणि पारदर्शकपणे कारवाई करते, यावर पुढील घडामोडी अवलंबून असणार आहेत. जनतेच्या भावना तीव्र असल्या तरी कायद्याच्या चौकटीत राहून न्याय मिळणे हीच खरी अपेक्षा असल्याचे वातावरण भिगवणमध्ये दिसून येत आहे.

## आधी बाप पळवला, मग पक्ष अन् आता भाऊ पळवायला निघाले

### राज-शिंदे भेटीवरून उद्धव ठाकरेंना टोला

**मुंबई, ता. १९ :** मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी बुधवारी (ता. १८) ठाण्यातील नंदनवन बंगल्यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतल्याने राज्याच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. या अनपेक्षित भेटीनंतर विविध राजकीय चर्चा रंगल्या असून आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या भेटीकडे विशेष लक्ष दिले जात आहे.

या भेटीनंतर शिवसेना शिंदे गटाच्या प्रवक्त्या शीतल म्हात्रे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर अप्रत्यक्ष बोचरी टीका केली. त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत, माझा पक्ष पळवला माझा बाप पळवला आता माझा भाऊ पळवला!!! असे लिहून राज ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्या भेटीचा फोटो शेअर केला.



या पोस्टमुळे राजकीय वर्तुळात नव्या चर्चांना उधाण आले आहे.

तसेच शिवसेना खासदार नरेश म्हस्के यांनीही सोशल मीडियावर प्रतिक्रिया देत म्हटले की, काल महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री नामदार एकनाथ शिंदे साहेब आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे साहेब यांची भेट झाली. अनेकांच्या भुवया उंचावल्या आणि अनेकांना पोटशूळही उठला. परंतु बाळासाहेबांच्या मुशीतून घडलेले दोन कार्यकर्ते हिंदुत्वाच्या विचारासाठी आणि बाळासाहेबांचे विचार पुढे नेण्यासाठी एकत्र येणार असतील तर माझ्यासारख्या तमाम शिवसैनिकांना आनंदच होईल. दरम्यान, सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, कल्याण-डोंबिवली महापालिका निवडणुकीत मनसेच्या नगरसेवकांनी शिवसेनेला दिलेल्या पाठिंब्याबद्दल एकनाथ शिंदे यांनी राज ठाकरे यांचे आभार मानले. तसेच राज ठाकरे यांनीही महापालिका सभागृहातील काम काजात मनसेचे सहकार्य राहील, असे आश्वासन दिल्याची चर्चा आहे. त्यामुळे या भेटीत केडीएमसी निवडणुकांसह आगामी राजकीय समीकरणांवर सविस्तर चर्चा झाल्याची शक्यता वर्तवली जात आहे. या भेटीमुळे महाविकास आघाडी आणि इतर विरोधी पक्षांमध्येही हालचाली सुरू झाल्याचे दिसत असून, राज्याच्या राजकारणात नवे समीकरण उभे राहण्याची चिन्हे आहेत.

# शिरूर येथे आठ वर्षांच्या चिमुकलीवर अत्याचार ; अल्पवयीन मुलगा ताब्यात



**शिरूर, ता. ९ :** पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील कान्हूर मेसाई गावातून एक अत्यंत विदारक आणि संतापजनक घटना समोर आली आहे. आपल्या घराच्या अंगणात खेळणाऱ्या एका ८ वर्षीय चिमुकलीवर गावातीलच एका अल्पवयीन मुलाने अत्याचार केला. ही भीषण घटना केवळ एका 'तापामुळे' उघडकीस आली असून, या बातमीने संपूर्ण जिल्हा सुन्न झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी घरात एकटी असल्याचे पाहून आरोपीने संधी साधली आणि तिच्यावर अत्याचार केला. या कृत्यानंतर त्याने चिमुकलीला कोणालाही काही न सांगण्याची धमकी दिली होती. दहशतीमुळे मुलगी गप्प राहिली, मात्र नियतीने हा प्रकार समोर आणला. सायंकाळच्या सुमारास मुलीला अचानक तीव्र ताप आला आणि तिची प्रकृती खालावली. तिला उपचारासाठी रुग्णालयात नेले असता, डॉक्टरांना तपासणीदरम्यान संशय आला. सखोल वैद्यकीय चाचणीत अत्याचार झाल्याचे निष्पन्न झाले आणि डॉक्टरांनी तातडीने पालकांना याची कल्पना दिली. धक्का बसलेल्या पालकांनी मुलीला विश्वासात घेतल्यावर तिने आपबिती सांगितली. यानंतर शिक्रापूर पोलिसांनी तातडीने सूत्रे हलवून संशयित अल्पवयीन मुलाला ताब्यात घेतले आहे. आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता आणि 'पोक्सो' कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे कान्हूर मेसाई परिसरात प्रचंड संताप व्यक्त होत आहे. विशेषतः लहान मुले आपल्या घराच्या अंगणातही सुरक्षित नाहीत का? असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे. या घटनेने ग्रामीण भागातील मुलांच्या सुरक्षिततेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

# वाल्मिक कराडचा गेम उलटला?; संतोष देशमुखनंतर महादेव मुंडे हत्येतही नाव चर्चेत



**बीड, ता. १९ :** बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येनंतर राज्यभरात संताप उसळला असतानाच या प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मिक कराड याच्या अडचणी वाढवणारी नवी घडामोड समोर आली आहे. परळीतील व्यापारी महादेव मुंडे यांच्या हत्येप्रकरणातही कराडचे नाव पुढे आल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. त्यामुळे आधीच गंभीर गुन्ह्यांमध्ये अडकलेल्या कराडसमोर आणखी मोठे कायदेशीर संकट उभे राहण्याची शक्यता आहे.

महादेव मुंडे यांची काही महिन्यांपूर्वी निर्घृण हत्या करण्यात आली होती. या घटनेने परळी शहर हादरले होते. व्यापारी संघटना आणि स्थानिक नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर आंदोलन करत आरोपींना अटक करण्याची मागणी केली होती. त्यानंतर राज्य सरकारने विशेष तपास पथक म्हणजेच एसआयटीची स्थापना करून तपास सुरू केला. तपासादरम्यान अनेक संशयितांची चौकशी, ब्रेन मॅपिंग आणि इतर वैज्ञानिक चाचण्या करण्यात आल्या.


या तपासात आता महत्त्वाचा टप्पा गाठला गेल्याचे मानले जात आहे. एकेकाळी वाल्मिक कराडचा निकटवर्तीय मानला जाणारा विजयसिंह उर्फ बाळा बांगर याचा जबाब नोंदवण्यात आला आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, या जबाबात बांगर यांनी वाल्मिक कराडसोबतच त्याच्या मुलाचेही नाव घेतल्याचे सांगितले जात आहे. मुंडे यांच्या हत्येमागील कट, संबंधित व्यक्ती आणि घटनाक्रमाबाबत काही ठोस माहिती त्यांनी तपास अधिकाऱ्यांना दिल्याचे समजते. या खुलाशामुळे तपासाला नवे वळण मिळाले असून कराड कुटुंबावर संशयाची सुई अधिक तीव्रतेने फिरू लागली आहे.

विशेष म्हणजे, या प्रकरणातील दोन संशयितांची नार्को चाचणी करण्यात येत असल्याची माहिती समोर आली आहे. या चाचण्यांमधून घटनाक्रमाबाबत अधिक तपशील समोर येण्याची शक्यता तपास यंत्रणा व्यक्त करत आहेत. आधीच संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मिक कराड तुरुंगात असून त्याच्यावर गंभीर आरोप आहेत. आता दुसऱ्या हत्येच्या तपासातही त्याचे नाव पुढे येत असल्याने कायदेशीर पातळीवर त्याच्यावरची पकड आणखी मजबूत होऊ शकते.

संतोष देशमुख हत्या प्रकरण आणि महादेव मुंडे हत्याकांड या दोन्ही घटनांनी बीड जिल्ह्यातील राजकीय आणि सामाजिक वातावरण ढवळून निघाले आहे. स्थानिक पातळीवर सत्ता, आर्थिक हितसंबंध आणि वैयक्तिक वैर या सगळ्यांचा गुंता या प्रकरणांत असल्याची चर्चा आहे. त्यामुळे तपास केवळ एखाद्या व्यक्तीपुरता मर्यादित न राहता व्यापक स्वरूप धारण करू शकतो, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

या घडामोडींमुळे राज्यभरातील जनतेचे लक्ष बीडकडे लागले आहे. दोषींना कठोर शिक्षा व्हावी आणि तपास पारदर्शकपणे व्हावा, अशी मागणी जोर धरत आहे. पुढील काही दिवसांत एसआयटीकडून आणखी कोणते पुरावे किंवा खुलासे समोर येतात, यावर या दोन्ही हत्याकांडांच्या तपासाची दिशा आणि भवितव्य अवलंबून राहणार आहे.

# शिवजयंती सोहळ्यापूर्वी शिवनेरीवर चेंगराचेंगरी



**जुन्नर, ता. १९ :** छत्रपती शिवाजी महाराज यांची जन्मभूमी असलेल्या किल्ले शिवनेरीवर शिवजयंतीनिमित्त मोठा उत्साह सुरू आहे. मोठ्या संख्येने शिवभक्तांची शिवनेरी गडावर मध्यरात्रीपासूनच गर्दी होण्यास सुरुवात झाली आहे.

मध्यरात्रीपासूनच गडाचा परिसर जय भवानी, जय शिवाजीच्या जयघोषाने दुमदुमून गेला होता. मात्र, क्षमतेपेक्षा जास्त गर्दी झाल्याने परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली आणि याचदरम्यान चेंगरीचेंगरीची घटना घडली आहे. किल्ल्यावरील अंबरखाना परिसरातील अरुंद दरवाजात शिवभक्तांची प्रचंड गर्दी झाल्याने चेंगराचेंगरीची परिस्थिती निर्माण झाली. या घटनेत काही शिवभक्त जखमी झाले. त्यांच्यावर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सुदैवाने, या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

शिवजयंती निमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही हजारो शिवभक्त शिवनेरी किल्ल्यावर दाखल झाले आहेत. मध्यरात्रीच्या सुमारास अंबरखाना परिसरातील हत्ती दरवाजा आणि गणेश दरवाजा यांच्या दरम्यान असलेल्या एका अरुंद दरवात गर्दी अवाक्याबाहेर झाली. येथील जागा अरुंद असल्याने आणि लोकांची संख्या प्रमाणाबाहेर गेल्याने चेंगराचेंगरीची स्थिती झाली. यात काही शिवभक्त खाली पडले आणि जखमी झाले.

किल्ले शिवनेरीवर आज छत्रपती शिवाजी महाराजांचा ३९६ वा जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. संपूर्ण शिवनेरी परिसर विद्युत रोषणाईने उजळून निघाला असून भगव्या रंगात न्हाऊन निघाला असून शिवभूमीचे दृश्य पाहण्यासाठी राज्यभरातून शिवभक्त मोठ्या संख्येने दाखल झाले आहेत.

दरम्यान, गावागावांमधून शिवभक्त सायकल रॅलीसह पायी चालत शिवज्योत घेऊन किल्ले शिवनेरीवर पोहोचले आहेत. मात्र या घटनेदरम्यान येथे पोलिस प्रशासन नसल्याची माहिती समोर आली आहे. पुरेसा बंदोबस्त नसल्याने चेंगराचेंगरीची घटना घडल्याचेही काहींनी म्हंटले आहे.

# माजी आमदार राजेंद्र राऊत यांना कोर्टाचा दणका; निवडणूक लढवताना खोटी माहिती देणं भोवलं



**बार्शी, ता. १९ :** बार्शी येथील अतिरिक्त मुख्य न्यायिक दंडाधिकारी रेवती एम. कांते यांच्या आदेशामुळे निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्याविरोधात खोटे प्रतिज्ञापत्र सादर केल्याच्या आरोपावरून दाखल करण्यात आलेली पाच जणांची संयुक्त तक्रार न्यायालयाने ग्राह्य धरली आहे.

ही तक्रार लोकप्रतिनिधी अधिनियम १९५१ मधील कलम १२५ अ अंतर्गत दाखल करण्यात आली होती. या कलमानुसार, उमेदवाराने निवडणूक शपथपत्रात जाणीवपूर्वक खोटी माहिती दिल्यास त्याच्यावर गुन्हा दाखल होऊ शकतो.

विशेष म्हणजे तक्रारदारांपैकी काहीजण बार्शीचे मतदार नसून काहीजण त्या मतदारसंघाचे रहिवासीही नाहीत. तरीही न्यायालयाने स्पष्ट केले की, निवडणुकीतील पारदर्शकता हा केवळ मतदारांचा किंवा प्रतिस्पर्धी उमेदवारांचा प्रश्न नसून तो सार्वजनिक हिताचा विषय आहे.

> बार्शी न्यायालयाचा हा आदेश भारतीय संविधान मधील अनुच्छेद ५१(क) नुसार प्रत्येक नागरिकाच्या कर्तव्याच्या संकल्पनेला बळ देणारा असल्याचे मत व्यक्त होत आहे. आम्ही भारताचे लोक या संकल्पनेची व्याप्ती अधिक व्यापक होत असून, लोकप्रतिनिधी कायद्याच्या अंमलबजावणीसाठी नागरिकांना सक्रिय भूमिका बजावण्याचा मार्ग या निर्णयामुळे अधिक स्पष्ट झाला आहे.
>
> - **मनिष रविंद्र देशपांडे,** मानव अधिकार कार्यकर्ता

न्यायालयाने सर्वोच्च न्यायालय तसेच विविध उच्च न्यायालयांच्या निर्णयांचा आधार घेत नमूद केले की, गुन्हेगारी न्यायप्रक्रियेत कोणताही नागरिक कायद्याची अंमलबजावणी व्हावी म्हणून पुढाकार घेऊ शकतो. कायद्यात संयुक्त तक्रारीवर बंदी नसल्याने पाच जणांनी एकत्रित दिलेली तक्रार वैध ठरते. त्यामुळे मी त्या मतदारसंघाचा मतदार नाही या कारणावरून तक्रार फेटाळता येणार नाही, हा महत्त्वाचा मुद्दा अधोरेखित झाला आहे.

या आदेशामुळे भविष्यात उमेदवारांनी शपथपत्रात दिलेल्या माहितीकडे अधिक गांभीर्याने पाहावे लागणार आहे. मालमत्ता, गुन्हेगारी प्रकरणे, शैक्षणिक पात्रता याबाबत चुकीची माहिती दिल्यास कोणताही जागरूक नागरिक न्यायालयाचा दरवाजा ठोठावू शकतो, हा स्पष्ट संदेश यातून गेला आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

# हवेलीसह पुणे जिल्ह्यातील काही प्राथमिक व माध्यमिक शाळांना शिवजयंतीचा विसर?

## शाळांमध्ये साधं प्रतिमापूजनही नाही ; पालकांचा संताप, शिक्षण विभागाच्या भूमिकेकडे लक्ष

**अश्लेषा मस्के**

पुणे, ता. १९ : राज्यभर छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त अभूतपूर्व उत्साहाचे चित्र पाहायला मिळाले. शहरांपासून खेड्यापाड्यांपर्यंत शिवप्रतिमांना पुष्पहार अर्पण करून, मिरवणुका, दुर्गपूजन, पोवाडे, व्याख्याने आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्राच्या अस्मितेचे प्रतीक असलेल्या या दिनानिमित्त सर्वत्र उत्साहाचे वातावरण होते. मात्र या उत्सवाच्या पार्श्वभूमीवर पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यासह काही शाळांमध्ये शिवजयंती साजरी न झाल्याच्या तक्रारी समोर आल्याने आश्चर्य आणि संताप व्यक्त केला जात आहे.

हवेली तालुक्यासह ग्रामीण तसेच निमशहरी भागातील काही प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये १९ फेब्रुवारी हा दिवस इतर दिवसांप्रमाणेच साध्या पद्धतीने पार पडल्याचे सांगितले जात आहे. काही ठिकाणी प्रतिमापूजनही झाले नाही, तर काही शाळांमध्ये शिक्षक अनुपस्थित असल्याने कोणताही औपचारिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला नाही, अशी माहिती पालकांनी दिली. विद्यार्थ्यांना शिवाजी महाराजांच्या कार्याबाबत मार्गदर्शन, भाषण स्पर्धा किंवा इतिहास कथन यासारखे उपक्रम न झाल्याने अनेक पालकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

छत्रपती शिवाजी महाराज हे




महाराष्ट्राच्या इतिहासातील केवळ एक राजा नव्हते, तर स्वराज्याचे प्रणेते आणि लोककल्याणकारी शासनव्यवस्थेचे शिल्पकार होते. लहान वयातच त्यांनी तोरणा जिंकत स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली. स्त्रियांचा सन्मान, धर्मनिरपेक्षता, शिस्तबद्ध लष्कर आणि सक्षम प्रशासन या तत्वांवर त्यांनी राज्य उभे केले. औरंगजेबासारख्या बलाढ्य साम्राज्याशी लढा देत त्यांनी महाराष्ट्राच्या स्वाभिमानाचे रक्षण केले. त्यांच्या जीवनप्रवासातील संघर्ष, त्याग आणि नेतृत्वगुण यामुळेच राज्याच्या इतिहासाच्या पाठ्यपुस्तकांमध्ये त्यांचा सविस्तर समावेश करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्याची प्रेरणा मिळावी, स्वराज्याची किंमत समजावी आणि राष्ट्रभक्तीची भावना बळकट व्हावी, हा त्यामागील उद्देश आहे. अशा व्यक्तिमत्त्वाच्या जयंतीदिनी शाळांमध्ये प्रेरणादायी कार्यक्रम होणे अपेक्षित असताना हवेली तालुक्यातील काही भागात निष्काळजीपणा दिसून आल्याची चर्चा आहे. पालकांचा प्रश्न आहे की, जर शिक्षणव्यवस्था विद्यार्थ्यांना इतिहासाचे धडे देत असेल, तर त्या इतिहासातील महान व्यक्तींच्या स्मृतिदिनांचे महत्त्व प्रत्यक्ष कृतीतून दाखवणे गरजेचे नाही का? काही पालकांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी घरीच सोशल मीडियावरून शिवाजी महाराजांविषयी माहिती पाहिली; परंतु शाळेतून कोणतेही मार्गदर्शन मिळाले नाही.

शिक्षणतज्ज्ञांच्या मते, शाळा या केवळ अभ्यासक्रम पूर्ण करण्यापुरत्या मर्यादित नसून मूल्यसंस्कार घडवण्याची जबाबदारी त्यांच्यावर असते. शिवजयंतीसारखे दिवस विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व, धैर्य, शिस्त आणि राष्ट्राभिमान या गुणांची जाणीव निर्माण करण्यासाठी महत्त्वाचे ठरतात. शिक्षकांची उपस्थिती आणि त्यांचा सक्रिय सहभाग विद्यार्थ्यांवर दीर्घकालीन प्रभाव टाकतो. त्यामुळे काही शाळांमध्ये शिक्षक गैरहजर असल्याच्या तक्रारी गंभीर स्वरूपाच्या मानल्या जात आहेत.

या पार्श्वभूमीवर हवेली तालुका आणि पुणे जिल्ह्यातील संबंधित शाळांबाबत शिक्षण विभागाने सखोल चौकशी करावी, अशी मागणी होत आहे. नेमके कोणत्या शाळांमध्ये कार्यक्रम झाले नाहीत, त्यामागील कारणे काय होती, शिक्षक उपस्थित का नव्हते, याची तपासणी होणे आवश्यक असल्याचे पालकांचे मत आहे. भविष्यात अशा महत्त्वाच्या दिवसांकडे कोणतीही शाळा दुर्लक्ष करणार नाही, यासाठी स्पष्ट मार्गदर्शक सूचना देण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य हे महाराष्ट्रासाठी केवळ इतिहासाचा भाग नसून आजच्या पिढीसाठी प्रेरणेचा अखंड स्रोत आहे. स्वराज्य, न्याय आणि स्वाभिमान यांची शिकवण देणाऱ्या या महापुरुषाच्या जयंतीदिनी शाळांमध्ये उत्साह आणि जागरूकता दिसणे अपेक्षित आहे. हवेली तालुक्यातील आणि पुणे जिल्ह्यातील काही भागात निर्माण झालेल्या या परिस्थितीची गांभीर्याने दखल घेऊन योग्य ती पावले उचलली जातील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

---

**प्राईम लाईफ**

## आठवड्यातून किती वेळा केस शॅम्पूने धुवावेत



केसांची निगा राखताना त्यांची योग्य पद्धतीने देखरेख करणेही तितकेच गरजेचे आहे. बाजारात उपलब्ध असलेले केसांसाठीचे शॅम्पू आपल्याला आढळतात. परंतु हे शॅम्पू किती वेळा लावायला हवेत यालाही तितकेच महत्त्व आहे. केसांना आठवड्यातून किती वेळा शॅम्पू लावावा हे केसांच्या प्रकारावर आणि आपल्या जीवनशैलीवर अवलंबून आहे.

तेलकट केसांना आठवड्यातून दोन ते तीन वेळा शॅम्पूने धुवावेत. जास्त घाम येत असेल किंवा रोज बाहेर जावे लागत असल्यास, तीन वेळा केसांना शॅम्पू लावणे उत्तम.

कोरडे केस असल्यास, आठवड्यातून फक्त एक ते दोन वेळा शॅम्पू करणे हितावह आहे. अधिक शॅम्पू केल्यास, केस अधिक कोरडे आणि नाजूक होऊ शकतात.

कोंडा असल्यास डॉक्टरांनी सुचवलेला अँटी-डॅन्ड्रफ शॅम्पू आठवड्यातून २३ वेळा वापरावा.

केसांना शॅम्पू लावण्यापूर्वी या गोष्टी लक्षात ठेवायला हव्यात.
शॅम्पू करण्यापूर्वी हलकेतेल लावल्यास केस मऊ राहतात.
खूप गरम पाणी वापरू नका.

शॅम्पूनंतर कंडिशनर वापरल्यास केस मऊ मुलायम होतात.

---

# अभिषेक शर्माने टी-२० वर्ल्ड कपमध्ये नोंदवला सर्वात लाजिरवाणा विक्रम

**अहमदाबाद, ता. १९ :** टी-२० विश्वचषक २०२६ च्या साखळी फेरीतील शेवटच्या सामन्यात भारताचा युवा सलामीवीर अभिषेक शर्मा याच्याकडून मोठ्या खेळीची अपेक्षा होती. मात्र, अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर नेदरलँड्सविरुद्ध खेळताना अभिषेकने चाहत्यांची मोठी निराशा केली आहे. सलग तिसऱ्या सामन्यात डक (शून्य) वर बाद होऊन त्याने भारतीय क्रिकेटच्या इतिहासात एका नकोशा विक्रमाची नोंद केली आहे.

कर्णधार सूर्यकुमार यादवने टॉस जिंकून प्रथम फलंदाजी निवडल्यानंतर अभिषेक शर्मा मैदानात उतरला. मात्र, केवळ तीन चेंडू खेळल्यानंतर आर्यन दत्तच्या चेंडूवर तो त्रिफळाचीत झाला. यासह



अभिषेक शर्मा टी- विश्वचषकाच्या एकाच हंगामात तीन वेळा शून्यावर बाद होणारा पहिला भारतीय खेळाडू ठरला आहे. यापूर्वी भारताचा कोणताही खेळाडू एकाच वर्ल्ड कपमध्ये तीन वेळा शून्यावर बाद झाला नव्हता.

टी-२० विश्वचषकाच्या इतिहासात सर्वाधिक वेळा (एकूण ३ वेळा) शून्यावर बाद होण्याच्या बाबतीत अभिषेकने माजी वेगवान गोलंदाज आशिष नेहराची बरोबरी केली आहे. त्याचबरोबर टी-२० आंतरराष्ट्रीयमध्ये सलग तीन सामन्यांत शून्यावर बाद होणारा तो वॉशिंग्टन सुंदरनंतरचा दुसरा भारतीय फलंदाज ठरला आहे. तसेच एकाच विश्वचषकात वेळा डकवर बाद होणाऱ्या आंद्रे फ्लेचर, रिची बेरिंग्टन आणि तांझिद हसन यांसारख्या खेळाडूंच्या नकोशा यादीत आता अभिषेकचा समावेश झाला आहे.

**सिराजची जर्सी अनलकी ठरली?**


या सामन्यात अभिषेक शर्माने एक वेगळा प्रयोग केला होता. तो स्वतःच्या जर्सीऐवजी वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजच्या नावाची जर्सी घालून फलंदाजीला आला होता. क्रिकेटमध्ये अनेकदा नशिबासाठी असे युक्त्या केल्या जातात, मात्र अभिषेकचा हा प्रयोग सपशेल फसला. गेल्या ७ डावांचा विचार केल्यास अभिषेक पाच वेळा शून्यावर बाद झाला आहे, जे त्याच्या फॉर्मबद्दल चिंता निर्माण करणारे आहे.

---

# मला रोहितची काळजी वाटते : खासदार सुप्रिया सुळे

**पुणे, ता. १९ :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार गेल्या काही दिवसांपासून सातत्याने मुद्दे मांडत आहेत. या पार्श्वभूमीवर पक्षाच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांनी रोहित पवार यांच्याबाबत चिंता व्यक्त केली आहे. तसेच मुख्यमंत्र्यांनी स्वतः रोहित पवारांच्या सुरक्षेचा आढावा घ्यावा, अशी मागणी केली आहे. सुप्रिया सुळे यांनी पुण्यात माध्यमांशी संवाद साधला त्यावेळी त्या बोलत होत्या.

जय, पार्थ, वहिनी आणि समस्त पवार कुटुंब आणि दादांवर प्रेम करणारे लाखो, करोडो लोक आहेत ज्यांच्या मनात अनेक प्रश्न आहेत, जी अस्वस्थ करणारे आहेत. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून रोहित अस्वस्थ असून सातत्याने न्याय मागण्यासाठी प्रयत्न करत आहे. त्याच वेळी पार्थ, जयवर



हा एवढा मोठा शॉक आहे. त्यामुळे या सगळ्या प्रक्रियेतून जयनेही काल त्याच्या भावना व्यक्त केल्या, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या.

अर्थाच मला रोहितची काळजी वाटते. कारण रोहित अनेक मुद्दे मांडतोय, भावना मांडतोय, तथ्य मांडतोय. डेटा दाखवतोय. त्यामुळे अनेक लोकांना त्याची काळजी वाटते. महाराष्ट्र सरकारला माझी विनंती आहे की, ज्या पद्धतीने रोहित लढतोय, त्यामुळे रोहितला सुरक्षा द्यावी. त्याच्या सिक्युरिटीचा सीएमनी आढावा घ्यावा, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या.

---

# लोणी काळभोर येथील तृतीयपंथीयाचा प्रामाणिकपणा; महागडा मोबाईल फोन पोलिसांच्या मदतीन केला मूळ मालकाला सुपूर्त

**लोणी काळभोर, ता. १९ :** आजच्या धावपळीच्या आणि स्वार्थी वातावरणात प्रामाणिकपणाची उदाहरणे क्वचितच पाहायला मिळतात. मात्र लोणी स्टेशन परिसरात घडलेल्या एका घटनेने समाजासमोर प्रामाणिकतेचा आदर्श ठेवला आहे. पायी जात असताना पर्स सापडली होती. त्यामध्ये महागडा वन प्लस कंपनीचा मोबाईल, एटीम कार्ड, महत्त्वाची कागदपत्रे होती. परंतु, कोणताही लोभ न बाळगता थेट पोलिसांकडे जमा करून तृतीयपंथी व्यक्तीने समाजाला एक सकारात्मक संदेश दिला आहे. ही घटना कदम वाकवस्ती (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील लोणी स्टेशन परिसरात बुधवारी (ता. १८) घडली.

सक्षम भालेराव (रा. बौद्ध वस्ती, लोणी काळभोर) असे मोबाईल परत



करणाऱ्या तृतीयपंथीचे नाव आहे. सक्षम हे आपल्या रोजच्या कामानिमित्त लोणी स्टेशन परिसरातून पायी जात असताना त्यांना रस्त्याच्या कडेला पडलेला एक महागडा स्मार्टफोन दिसला. तपासून पाहिले असता तो वन प्लस कंपनीचा असल्याचे लक्षात आले. तसेच कागदपत्रे सुद्धा मिळून आली होती.

आजच्या परिस्थितीत अशा प्रकारच्या वस्तू सापडल्यावर स्वतःकडे ठेवण्याचा मोह अनेकांना होऊ शकतो. मात्र सक्षम भालेराव यांनी कोणताही विलंब न लावता थेट लोणी काळभोर पोलीस ठाणे गाठले. त्यांनी संपूर्ण माहिती पोलिसांना दिली आणि मोबाईलसह पर्स त्यांच्या ताब्यात सुपूर्द केला. पोलिसांनी तत्काळ मोबाईलमधील संपर्क तपासून मूळ मालकाचा शोध घेतला.

थोड्याच वेळात मोबाईल व पर्स हरवल्याने हताश झालेले संदीप साळुंखे (रा. कदमवाकवस्ती, ता. हवेली) यांना लोणी काळभोर पोलिसांकडून फोन आला आणि त्याला सुखद धक्का बसला. पोलीस ठाण्यात बोलावून योग्य खात्री करून मोबाईलसह पर्स त्याच्या स्वाधीन करण्यात आला. यावेळी लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे, पोलिस उपनिरीक्षक अनिल जाधव, पोलिस हवालदार रवी आहेर, महेश करे व पोलिस कर्मचारी उपस्थित होते. आपला महागडा मोबाईल सुरक्षित परत मिळाल्याने दीप साळुंखे यांनी सक्षम भालेराव आणि पोलिसांचे मनापासून आभार मानले.


दरम्यान, या घटनेमुळे तृतीयपंथी समाजाबाबत असलेल्या काही गैरसमजांना छेद देणारे उदाहरण समोर आले आहे. सक्षम भालेराव यांच्या या कृतीमुळे समाजात अजूनही प्रामाणिकपणा, जबाबदारी आणि नैतिक मूल्ये जिवंत असल्याचा विश्वास बळकट झाला आहे. लोणी स्टेशन परिसरात घडलेल्या या घटनेची सर्वत्र चर्चा सुरू असून सक्षम भालेराव यांच्या प्रामाणिकतेचे कौतुक होत आहे. त्यांच्या या कृतीने समाजात सकारात्मक संदेश दिला असून सापडलेले परत करणे हीच खरी इनामदारी याचा प्रत्यय पुन्हा एकदा आला आहे.

---

# भारताची दक्षिण आफ्रिका, झिम्बाब्वे आणि वेस्ट इंडिजशी लढत

**मुंबई, ता. १९ :** टी- २० विश्वचषक मधील साखळी सामने संपल्यानंतर आता सुपर फेरीचे चित्र पूर्णपणे स्पष्ट झाले आहे. नामिबियाचा पराभव करून पाकिस्तानने या फेरीत प्रवेश करणारा आठवा आणि शेवटचा संघ म्हणून आपली जागा निश्चित केली आहे. विशेष म्हणजे, भारत आणि पाकिस्तान वेगवेगळ्या गटात असल्यामुळे सुपर मध्ये या पारंपरिक प्रतिस्पर्ध्यांची लढत पाहायला मिळणार नाही. सुपर ८ फेरीसाठी आठ संघांना दोन गटांत विभागण्यात आले आहे

भारतीय संघाने साखळी फेरीत अजेय राहत दिमाखात पुढची फेरी गाठली आहे. भारताचा पहिला मोठा सामना २२ फेब्रुवारीला अहमदाबादमध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्ध होणार आहे. त्यानंतर संघ चेन्नई




आणि कोलकाता येथे अनुक्रमे झिम्बाब्वे आणि वेस्ट इंडिजशी भिडणार आहे. उपांत्य फेरी गाठण्यासाठी भारताला आपल्या गटातील अव्वल दोन संघांत स्थान मिळवावे लागेल.

**सुपर ८ संघ**

गट-१ भारत, दक्षिण आफ्रिका, वेस्ट इंडिज आणि झिम्बाब्वे. गट -२ श्रीलंका, पाकिस्तान, न्यूझीलंड आणि इंग्लंड.

---

# घरावर डंपर आदळून महिलेचा मृत्यू; मुळशीतील कातरखडक गावातील दुर्घटना

**पुणे, ता. १९ :** पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यात सुरू असलेल्या रिंग रोडच्या कामादरम्यान बुधवारी सकाळी घडलेल्या भीषण अपघातात एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला. भरावाचे काम करणारा डंपर चालकाचा ताबा सुटल्याने रस्त्याच्या कडेला असलेल्या घरावर जाऊन उलटला आणि घराचा काही भाग कोसळला. या ढिगाऱ्याखाली दबून नंदा जगन्नाथ मालपोटे यांचा जागीच मृत्यू झाला.



सकाळच्या सुमारास माती टाकण्याचे काम सुरू असताना डंपर अचानक घसरला. अवजड वाहन थेट घरावर कोसळल्याने घरातील महिलेला बाहेर पडण्याची संधीच मिळाली नाही. स्थानिक नागरिकांनी तत्काळ धाव घेत ढिगारा हटवण्याचा प्रयत्न केला, मात्र अपघाताची तीव्रता इतकी गंभीर होती की त्यांचा जीव वाचवता आला नाही.

घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले. मृतदेह बाहेर काढून शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे. या अपघातानंतर ग्रामस्थांनी तीव्र संताप व्यक्त केला. रिंग रोडच्या कामात सुरक्षेच्या उपाययोजना पाळल्या जात नसल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. अवजड वाहनांची बेफिकीर हालचाल, योग्य संरक्षण भिंत किंवा अडथळ्यांचा अभाव आणि कामाच्या ठिकाणी देखरेखीची कमतरता यामुळे हा बळी गेला, अशी भावना व्यक्त होत आहे. ग्रामस्थांनी मृत महिलेच्या कुटुंबीयांना तातडीने आर्थिक मदत आणि योग्य नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे. प्रशासनाने चौकशीचे आश्वासन दिले असून दोषींवर कारवाई होईल, असे सांगितले आहे. या प्रकरणी गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया सुरू असून तपास पुढे चालू आहे.

---

# बारावी परीक्षेत कॉपीबहाद्दरांना दणका; ३४ कर्मचाऱ्यांचे निलंबन तर २७ जणांवर गुन्हे दाखल

**मुंबई, ता. १९ :** राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात येत असलेल्या बारावीच्या परीक्षेत कॉपीमुक्त अभियानाचा फज्जा उडवणाऱ्यांविरोधात बोर्डाने मोठी कारवाई केली आहे. परीक्षेदरम्यान झालेल्या सामूहिक कॉपी प्रकरणाची गंभीर दखल घेत राज्यभरातील ३४ कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. तसेच २७ जणांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले असून बोर्डाचे अध्यक्ष नंदकुमार बेंडसे यांनी या कारवाईची अधिकृत माहिती दिली आहे.

बारावीच्या परीक्षेत कालपर्यंत राज्यभरात एकूण १०९ कॉपीची प्रकरणे नोंदवण्यात आली आहेत. यात सर्वाधिक प्रकरणे अमरावती विभागात समोर आली असून तेथे ५० गुन्हे दाखल झाले आहेत. या व्यतिरिक्त पुणे विभागात २७, नागपूरमध्ये ११, लातूरमध्ये ११, छत्रपती संभाजीनगरमध्ये ६ आणि नाशिकमध्ये ४ ठिकाणी कॉपीची प्रकरणे उघडकीस आली आहेत. या वाढत्या प्रकरणांमुळे बोर्डाने आता कडक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.

वाशीम जिल्ह्यातील श्री मैनागिरी महाराज विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, टो-जुमडा येथे भौतिकशास्त्र विषयाच्या पेपरवेळी सामूहिक कॉपीचा धक्कादायक प्रकार समोर आला होता. राज्य मंडळाने आणि जिल्हा दक्षता समितीने या प्रकरणाची



गंभीर दखल घेत या केंद्रावरील २६ कर्मचाऱ्यांना निलंबित केले आहे. या कर्मचाऱ्यांविरोधात पोलिसात गुन्हा दाखल करण्याचे आदेशही देण्यात आले असून या कारवाईमुळे शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

**बीडमध्ये छतावरून दगडफेक पद्धतीने कॉपी**

बीडच्या गेवराई तालुक्यातील पाडळसिंगी येथे बारावीच्या परीक्षेदरम्यान कॉपी पुरवण्याचा एक अजब प्रकार कॅमेऱ्यात कैद झाला आहे. चक्क दगडाला कॉपी बांधून ती खिडकीतून वर्गात फेकतानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. विशेष म्हणजे जिल्हाधिकाऱ्यांनी कॉपीमुक्त अभियान राबवल्याचा आणि प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही कॅमेरे लावल्याचा दावा केला होता, मात्र या घटनेने प्रशासनाच्या दाव्यातील फोलपणा उघड केला आहे.

**तंत्रज्ञानाचा वापर आणि ३१ केंद्रे बंद**

कॉपीमुक्त अभियानांतर्गत बोर्डाने सोशल मीडियाचा प्रभावी वापर सुरू केला आहे. सुमारे ३३ हजार शिक्षक, कर्मचारी आणि मुख्याध्यापकांना ई-मेल, एसएमएस आणि व्हॉट्सपद्वारे मार्गदर्शन करण्यात आले आहे. तसेच संवेदनशील १९१ केंद्रांवर जनजागृती करण्यासाठी मान्यवरांचे व्हिडिओ प्रसिद्ध करण्यात आले आहेत. दरम्यान, गैरप्रकार आढळल्यामुळे राज्यातील ३१ परीक्षा केंद्रे कायमची बंद करण्यात आली असून ५५४ केंद्रांवर अद्याप सीसीटीव्ही सुविधा नसल्याची माहिती समोर आली आहे.